Vol 3 Issue 9 March 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-9 | March-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# श्रीरामपूर तालुक्याच्या विकासातील मुळा–प्रवरा वीज सोसायटीचे योगदान

**बाळासाहेब लहानू बढे**

सहयोगी प्राध्यापक, आर्. बी. एन्. बी. कॉलेज श्रीरामपूर.

*सांराशः*

सहकार चळवळीबाबत अहमदनगर जिल्हयाचा सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल. आजकाल सहकार मानवी जीवनाचा स्थायी भाव झाला असून सहकार चळवळीच्या क्षेत्रात नवनवीन प्रयोग होत आहेत. सहकारी संस्थेमार्फत वीज वितरण, विद्युत व्यवस्था प्रकल्प उभारणी हा अभिनव प्रयोग असून महाराष्ट्रातील या प्रयोगाचा बहुमान दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर या सहकारी संस्थेला मिळाला होता.1 कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये ऊर्जा हा अत्यंत महत्वाचा घटक असतो. राष्ट्राच्या जडणघडणीच्या दृष्टीने आवश्यक भौतिक सोयी सुविधा उपलब्ध होण्याकरिता विद्युत पुरवठा ही किंबहुना सर्वात महत्वाची बाब होय. केवळ शहरीभागातच नव्हे तर औद्योगिक प्रक्रियेबरोबरच ग्रामीण भाग, कृषी उत्पादन व त्याच्याशी निगडीत इतर गतीविधींसाठी विद्युत पुरवठा अत्यावश्यक ठरतो. म्हणूनच ग्रामीण विद्युत पुरवठयाचे योग्य नियोजन आणि प्रभावी कार्यवाही अत्यंत गरजेची आहे. भारतात ग्रामीण विद्युत पुरवठया संदर्भात वेगवेगळया राज्यांमध्ये काही क्रांतीकारी पाऊले उचलली गेली. उदा. गुजरात राज्यात कोडीनार, म्हैसुर प्रांतात हुकेरी, उत्तर प्रदेशात लखनौ, आंध्रप्रदेशात सरशिला तर महाराष्ट्रात श्रीरामपूर.

*प्रस्तावनाः*

दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर या संस्थेची नोंदणी राष्ट्रीय ग्रामीण विद्युत पुरवठा अनुसंधान (REC) द्वारे 2/10/1969 रोजी नोंदणी क्रमांक ए.एन्. आर/जी.एन्.एल्./107 नुसार झालेली होती.2 संस्थेच्या स्थापनेनंतर भारतीय विद्युत कायदा 1910 प्रमाणे आवश्यक असणारा परवाना महाराष्ट्रासरकारने सदर सोसायटीला दिनांक 28/1/1971 रोजी दिला. सुरुवातीला या संस्थेचे 2188 सभासद होते. तर 2007 मध्ये ही सभासद संख्या 60550 पर्यंत गेली होती. सुरुवातीला तांत्रिक काम करणारा अनुभवी कर्मचारी वर्ग महाराष्ट्रराज्य वीज मंडळाकडून काही दिवसांसाठी संस्थेने घेतला होता.

दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप. सोसायटी चे प्रायोजकत्व आणि आर्थिक पाठबळ हे राष्ट्रीय ग्रामीण विद्युत पुरवठा अनुसंधान ;त्म्द्धनवी दिल्ली यांचे मार्फत केले गेले. प्रारंभीच्या काळात सदर इलेक्ट्रीक सोसायटीचे मुख्यालय राहुरी येथे होते. मात्र नंतर ते जुलै 1976 मध्ये श्रीरामपूर येथे स्थानांतरीत करण्यात आले. ही संस्था ग्रामीण भागाचा विकास होण्याच्या दृष्टीने स्थापन झाली. या संस्थेचे प्रमुख कार्यालय श्रीरामपूर येथे असून उपविभागीय कार्यालये राहुरी, बाभळेश्वर आणि देवळाली प्रवरा या ठिकाणी आहेत. या संस्थेचे वार्षिक अंदाजपत्रक 1 कोटी 36 लाख रुपये होते. संस्थेचा दैनंदिन कारभार संस्थेचे सरव्यवस्थापक यांच्या देखरेखीखाली होतो. 1970–1971 मध्ये संस्थेच्या तांत्रिक व वाणिज्य विभागात फक्त 184 कर्मचारी होते तर 1986–1987 अखेर संस्थेत 911 कर्मचारी होते.3 तर 2006–2007 अखेर संस्थेत 1060 कर्मचारी असल्याचे निदर्शनास आले.4 म्हणजेच कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते.

या संस्थेने श्रीरामपूर शहराच्या व तालुक्याच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिलेले होते. पिण्याच्या पाण्याच्या योजनेला विजबिलात संस्था 50 टक्के सुट देत होती. दुर्बल घटकांना विजेचा फायदा व्हावा म्हणून अगदी अल्प रक्कम घेऊन संस्थेने "जनता योजना" राबविली होती.5 तसेच अल्प उत्पन्न गटातील लोकांना वीज कनक्शन घेता यावे म्हणून, दिर्घ मुदतीच्या दृष्टीनक रक्कम स्विकारुन नविन कनेक्शन्स संस्थेने दिलेली होती. श्रीरामपूर नगरपालिकेने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी बोअर वेल्स (विद्युत विहीरी) घेतल्या होत्या. या सर्व विहीरींना संस्थेने विनाविलंब वीजपुरवठा केला होता. व या विद्युत विहीरीच्या विजबिलातही 50 टक्के सूट देत होती. ही संस्था श्रीरामपूर शहराच्या व तालुक्याच्या गरजा व अडचणी सोडविण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करते. श्रीरामपूर, राहुरी हे संपूर्ण तालुके आणि त्याचबरोबर नेवासा व संगमनेर तालुक्यातील काही गावे यांच्या विद्युत पुरवठयामध्ये या इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटीने अत्यंत महत्वाचे योगदान दिले.

***मुळा–प्रवरा वीज सोसायटी कामकाज पध्दती :–***

1.नविन सर्व्हिस कनेक्शन देणे.
2.एल.टी.11के.व्ही. व 33के.व्ही. वाहिणी व ट्रान्सफॉर्मर सेंटरची उभारणी करणे.
3.नविन 33/11के.व्ही. उपकेंद्र उभारणे, उपकेंद्रांची क्षमता वाढविणे अशी भांडवली कामे करणे.
4.नदुरुस्त ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करणे.
5.वीज मिटर तपासणी करणे.
6.मिटरचे मासिक रिडींग घेणे, संगणकीय वीज बिले तयार करणे व ती ग्राहकांपर्यंत पोहचविणे.
7.वीज बिलाची दरमहाची वसुली करणे, थकबाकी वसुली करताना ग्राहकांशी सुसंवाद साधुन कुठलीही कटुता न येता वसुल करणे.
8.लाईन व सबस्टेशनसाठी लागणारे फॅब्रिकेशन तयार करणे.
9.सबस्टेशन उभारणीसाठी नकाशा तयार करणेपासुन रंगकाम करणेपर्यंत सर्व कामे करणे.
10.उपकेंद्रातील ब्रेकर व ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करणे, तांत्रिक बिघाड वेळेत दुरुस्त करणे व देखभाल करणे.

11.संस्थेच्या कार्यक्षेत्रातील संपुर्ण नेटवर्कची दैनंदिन देखभाल करणे.

अशी विविध प्रकारची कामे बाहेरची मदत न घेता कर्मचाऱ्यांमार्फतच करण्याचे सोसायटीचे धोरण होते. व्यापारी वीज गळतीचे प्रमाण कमी होण्यासाठी वीज सोसायटीच्या मार्गदर्शनाखाली फोटो मिटर रिडींग योजनेत कमचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतलेला होता. सभासदांच्या तक्रारी व गाऱ्हाणी ऐकुन घेऊन समस्या त्वरेने सोडविण्यासाठी वीज सोसायटीचे व्यवस्थापक व इतर पदाधिकारी मुख्य कार्यालय व उपविभागीय कार्यालयात कधीही उपलब्ध असतात. त्यामुळे ग्राहकांच्या समस्या त्वरेने सोडविणे वीज सोसायटीला शक्य झाले आहे. अशाप्रकारे संस्थेतील व्यवस्थापन, कर्मचारी व सभासदांचे समन्वयामुळे गेल्या 35 वर्षात रुपये 150 कोटींची जिंदगी व मालमत्ता उभारण्यात वीज सोसायटीला यश आले होते.6

गोदावरीच्या पुरात अनेक गावांतील लाईन व ट्रान्सफॉर्मर वाहून गेले होते. पुर ओसरल्यानंतर लगेचच व्यवस्थापनाने निर्णय घेतला व कर्मचाऱ्यांनी एक आठवडयात तेथे नविन नेटवर्कची उभारणी केली. व वीज पुरवठा सुरळीत केला. दरवर्षी वादळात लाईनचे नुकसान होते तेव्हा कमीत कमी वेळेत वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम वीज सोसायटी करते. सभासदांना वीजेपासून वंचित न ठेवण्याचे व्यवस्थापनाचे धोरण प्रत्यक्षात आणले जात होते. ग्राहक हा देव, ग्राहक हा राजा हे व्यापार क्षेत्रातले तत्व वीज सोसायटीने स्विकारलेले आहे. त्यामुळे ग्राहकांशी सोहार्दपूर्ण संबंध ठेवण्याकडे व त्याचप्रमाणे काम करण्याकडे कटाक्षाने लक्ष देण्याची वीज सोसायटीची धारणा होती.

ऊर्जा संवर्धनाचे काम करणे वीज सोसायटीला गरजेचे वाटले म्हणून सोसायटीने स्वखर्चाने काही अभियंत्यांना ब्युरो ऑफ एनर्जी इफिसिएन्सी यांच्या एनर्जी ऑडीटर व एनर्जी मॅनेजर या परिक्षा देऊन सर्टिफाईड केलेले होते. मोठया प्रमाणावर असलेला शेती वीज वापर लोड विचारात घेऊन वीज सोसायटीने कर्मचाऱ्यांमध्ये ऊर्जा संवर्धनाची जागृती केली. त्यातुन शेतकरी ग्राहकांना हे महत्व पटवून दिले. त्याचे फलित म्हणून शेती ग्राहकांच्या वीज पंपाला सुमारे 8000 केव्हीएआर क्षमतेचे कपॅसिटर बसविणे शक्य झाले आहे. त्यातूनच सिस्टीम पॉवर फॅक्टर सुधारणा झालेली होती.

कर्मचाऱ्यांच्या कामावर वीज सोसायटीचा विश्वास होता. कामाचा दर्जा राखणे, दिलेले काम वेळेत पूर्ण करणे, ग्राहकांना विनम्र व तत्पर सेवा देणे, नवनविन उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर कामकाजांत करणे, ज्या कर्मचाऱ्याकडे जे कौशल्य असेल ते काम त्याच्याकडून करुन घेणे ही वैशिष्टे वीज सोसायटीने हेरली. त्यामुळे सर्व कामे कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्याचे धोरण वीज सोसायटीने ठरविलेले होते. त्याला उत्तम प्रतिसाद देऊन कोणतीही बाहेरची मदत न घेता कर्मचाऱ्यांनी अनेक कामे केलेली आहेत.

मा. आयोगाच्या निर्देशानुसार संस्थेने राज्याचे निवृत्त मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखाली तक्रार मंच स्थापन केलेला आहे. त्या मंचाकडे स्थापनेपासून वीज सोसायटीच्या कामकाजासंदर्भात एकही तक्रार दाखल झालेली नाही.

### *दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटीची ठळक वैशिष्टये :–*

1.दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी महाराष्ट्र राज्य सहकार कायदा 1960 च्या अंतर्गत 2 ऑक्टोबर 1969 रोजी स्थापन करण्यात आली. (रजिस्ट्रेशन नं. ।छत्ध्ळछस्ध107 वर्ष 1969).

2.भारतीय विद्युत पुरवठा कायदा 1910 च्या कलम 3 नुसार 28 जानेवारी 1971 रोजी या सोसायटीला 20 वर्षासाठी वीज वितरणाचा परवाना देण्यात आला. (लायसन नं. LMP.1070/53484/Electriv)

3.या सोसायटीचे प्रत्यक्ष कामकाज 1 मार्च 1971 रोजी सुरु झाले. सुरुवातीच्या काळात सोसायटीचे भाग भांडवल हे रु. 193.25 लाखापर्यंत होते. नंतर म्हणजेच 1988 मध्ये ते रु. 1612.74 लाखापर्यंत गेले.

4.या इलेक्ट्रीक सोसायटीचे कार्यक्षेत्र हे श्रीरामपूर व राहुरी तालुक्यातील सर्व 166 गावे आणि नेवासा व संगमनेर तालुक्यातील अनुक्रमे 4 आणि 5 गावे हे होते.

5.मार्च 1978 पर्यंत या इलेक्ट्रीक सोसायटीने या सर्व गावांमध्ये सुरळीतपणे वीजपुरवठा सुरु केला.

या सोसायटीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सक्षम आर्थिक नियोजन आणि चांगल्या व्यवस्थापनाच्या आधारे आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व सदस्य व इतर घटकांना वाजवी दरात नियमित वीज पुरवठा करणे हे होते.7 हे उद्दिष्ट गाठण्यासाठी या इलेक्ट्रीक सोसायटीने महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून व्यापक प्रमाणात वीज खरेदी केली आणि आपल्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांना वितरीत केली. या वितरणा संदर्भात आवश्यक असलेली विद्युत साधने नेटवर्क हे राष्ट्रीय ग्रामीण विद्युत पुरवठा अनुसंधान (REC) च्या अर्थसाहयातून पुर्ण केले. सुरुवातीच्या काळात सदर वीज वितरणासाठी प्रशिक्षीत कामगारांची समस्या निर्माण झाली. मात्र नंतर महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या मदतीने पुढच्या काळात वीज सोसायटीच्या स्वतःच्या प्रयत्नातून ह्या समस्येचे निराकरण केले गेले.

दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटीने स्थापनेपासून शेतीसाठी, घरगुती वापरासाठी, व्यापारी वापरासाठी आणि औद्योगिक वापरासाठी आवश्यक त्या दाबाने वीज पुरवठा नियमितपणे केला. त्याचबरोबर सार्वजनिक वापरासाठी उदा. रस्त्यांवरील दिवे, पिण्याच्या पाण्याच्या योजना यांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करुन सामाजिक बांधिलकी जपली. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या धर्तिवर वीज सोसायटीने आपल्या नियमावलीच्या आधारे वीज वितरणाचे कार्य केले. मात्र ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवेच्या संदर्भात, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळापेक्षा या इलेक्ट्रीक सोसायटीने अधिक दर्जेदार व विनाविलंब सेवा आपल्या ग्राहकांना दिली. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळापेक्षा अत्यंत त्वरीत वीज कनेक्शन या इलेक्ट्रीक सोसायटीमार्फत होत असे. मर्यादित कार्यक्षेत्र असल्याने सोसायटीच्या प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधला जाऊन समस्यांचे निवारण होत असे. या इलेक्ट्रीक सोसायटीच्या प्रगतीमध्ये ग्राहकांचा प्रत्यक्ष सहभाग आणि मालकी हक्काची भावना हे महत्वाचे घटक होते.

### *वीज सोसायटीचे श्रीरामपूर तालुक्याच्या विकासातील योगदान :–*

प्रवरा व गोदावरी या नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात असलेल्या श्रीरामपूर तालुक्यातील सर्व गावांना मुळा प्रवरा वीज सोसायटीच्या माध्यमातून सिंचनाचे जाळे पसरविणे शक्य झाले. त्यामुळे या तालुक्यातील शेतकरी वेगाने सधन होण्यास मदत झाली. याचमुळे श्रीरामपुर तालुका हा महाराष्ट्रातील अग्रगण्य ऊस उत्पादक तालुका म्हणून नावारुपास आला. जवळपास संपूर्ण तालुका हा सिंचन क्षेत्राखाली आणणे या वीज सोसायटीमुळे अल्पावधीत शक्य झाले.

भंडारदरा धरणाचे बांधकाम 1925 मध्ये पूर्णत्वाला गेले. या धरणापासून 45 मैलावर प्रवरा नदीतूनच ओझर येथे डावा व उजवा प्रवरा कालवा निर्माण केला आहे. 8 त्यापैकी प्रवरा डावा कालवा श्रीरामपूर तालुक्यासाठी वरदान ठरलेला आहे. भंडारदरा धरणामुळे 52 टक्के पाणी श्रीरामपूर तालुक्यासाठी मंजूर झाले होते.9 या पाणी पुरवठयाच्या कामात मुळा प्रवरा वीज सोसायटीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरली. केवळ कृषी क्षेत्रासाठीच नव्हे तर औद्योगिक क्षेत्राकरीता देखील सदर सोसायटीचे योगदान मोठे राहिले आहे. श्रीरामपूर हे शहर अगदी नजिकच्या काळात उदयास आलेले आहे. परंतु हे शहर प्रचंड वेगाने विस्तारीत झाले आहे. तेव्हा या शहराच्या नागरी विस्ताराच्या दृष्टीने आणि येथील नागरीकांच्या ऊर्जेच्या गरजा भागविण्याचे महत्वाचे कार्य या सोसायटीने जवळपास चार दशके मोठया जबाबदारीने पार पाडले.

ग्रामीण भागात कार्य करत असताना या वीज सोसायटीने शेतीसाठी पंपाना वीज पुरवठयाला प्राधान्य दिले. त्यामुळेच शेतकऱ्यांची डिझेलपंपापासून मुक्तता झाली. आणि शेतकऱ्यांची मोठी आर्थिक बचत होऊ लागली. तसेच पुर्ण वेळ, नियमित व योग्य दाबाने वीज उपलब्ध होऊ शकल्याने शेतकरी मनाप्रमाणे, गरजेनुसार व्यापारी पिके घेऊ लागला. शेतकरी बाराही महिने शेतीतून भरघोस उत्पन्न घेऊ लागला. त्याचबरोबर दुग्ध व्यवसाय, कुक्कूटपालन, मेषपालन यांचीही भरभराट श्रीरामपूर तालुक्यामध्ये होण्याच्या दृष्टीने मदत झाली. श्रीरामपूर तालुका हा नगर जिल्हयातून शुगर बेल्टचा मुख्य तालुका मानला जातो. कारण याच तालुक्यात पहिला खाजगी साखर कारखाना हरेगाव येथे ब्रिटीश कंपनीने सुरु केला होता. टिळकनगर येथे डहाणूकर उद्योग समुहाने स्वतःचा खाजगी साखर कारखाना हरेगाव येथे ब्रिटीश कंपनीने सुरु केला होता. टिळकनगर येथे डहाणूकर उद्योग समुहाने स्वतःचा खाजगी साखर कारखाना राष्ट्रवादी भावनेतून सुरू केला होता. आशिया खंडात सहकारी तत्वावरील पहिला साखर कारखाना प्रवरानगर येथे सुरू झाला होता. त्यानंतर अशोक सहकारी साखर कारखानाही श्रीरामपूर तालुक्यातच सुरु झाला असल्याने हा तालुका शुगर बेल्ट

म्हणून ओळखला जातो. ही ओळख निर्माण होण्यात या वीज सोसायटीचा सिंहाचा वाटा आहे. अशा रितीने आशिया खंडातील सर्वात मोठी सहकारी तत्वावरील मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी हे या शहराचे भूषण आहे.10

### *मुळा प्रवरा इलेक्ट्रीक सोसायटीचा ऱ्हास :–*

संपुर्ण भारतात सर्वात मोठे परिक्षेत्र असलेली ही वीज सोसायटी नंतर मात्र प्रचंड वित्तीय तुटीत सापडली. ही तूट दिवसेंदिवस वाढत जाऊन शेवटी महाराष्ट्र राज्य सरकारची ही दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी अखेर बंद करणे भाग पडले. 2011 मध्ये ही सोसायटी बंद करण्याचे घोषीत केले. यानंतर मुळा–प्रवराच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरू केला. मुळा प्रवरा इलेक्ट्रीक सोसायटीच्या ऱ्हासाची काही ठळक कारणे पुढीलप्रमाणे देता येतील.

1.वीज गळती–जवळपास 50 टक्के पर्यंत वीज गळतीचा मोठा ठपका मुळा प्रवरा इलेक्ट्रीक सोसायटीवर होता. त्यामुळे मुळा प्रवरा इलेक्ट्रीक सोसायटीची अर्थव्यवस्थाच हळूहळू कोलमडून पडू लागली. या सोसायटीने वीज गळती रोखण्यासाठी अनेक प्रयत्न केले. मात्र ते अपुरे पडले याला राजकीय हस्तक्षेप कारणीभूत ठरला.
2.महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाची कोणतीही थकबाकी न ठेवता वित्तीय तूट कमी करण्याचा प्रयत्न या वीज सोसायटीला झेपेणासा झाला. समान दराने (टेरीफ प्रणाली) वीज आकारणी प्रणाली लागू केल्यानंतर तर दरवर्षी या वीज सोसायटीची वित्तीय तूट प्रचंड प्रमाणात वाढू लागली.
3.टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने आपल्या वीज आकारणी दरात वाढ केली तरी मुळा प्रवरा इलेक्ट्रीक सोसायटीने तसे न केल्याने ही तूट प्रचंड वाढली. त्यातूनच या वीज सोसायटीचे आर्थिकदृष्टया कंबर मोडले.
4.थकबाकीदारांकडून वसूलीच्या बाबतीत काटेकोर धोरण हे नंतर सैल पडू लागले. राजकीय दबाव, सामाजिक समस्या, निवडून आलेले लोकप्रतिनिधी या सर्वामुळे थकबाकी धारकांकडून वीज बिल वसुलीचे प्रयत्न हे अपुरे ठरले.
5.कोणत्याही आर्थिक संस्थेमध्ये राखीव आर्थिक निधीची तजवीज अत्यंत आवश्यक असते. मात्र या वीज सोसायटीच्या संदर्भात वेळोवेळी या बाबतीत प्रशासनाने गांभिर्य न दाखवल्याने ही वीज सोसायटी मोडकळीस येऊ लागली.
6.कोणत्याही सोसायटीमार्फत अनुसूचित जातीजमातीच्या लोकांना दिलेल्या अल्प कर्जाचा परतावा देखील झाला नाही. यामुळे या वीज सोसायटीच्या तोटयात आणखीच भर पडली.
7.मुळा प्रवरा वीज सोसायटीवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी या वीज सोसायटीच्या हितापेक्षा आणि दूरगामी परिणामांना लक्षात घेण्याऐवजी आपापल्या भागातील हितांना प्राधान्य दिले. त्यातूनच भ्रष्टाचार, प्रचंड प्रमाणात थकबाकी यातून ही वीज सोसायटी मोडकळीस आली.

थोडक्यात शेतकी ग्राहकांसाठी समान दराची वीज आकारणी पध्दती (HP Flat rate tariff system) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाची नियमित वीज दर वाढ या दोन बाबींमुळे आणि थकबाकी वसूल करण्यात आलेल्या अपयशामुळे त्याचबरोबर या सोसायटीबाबत महाराष्ट्र शासनाच्या प्रतिगामी धोरणामुळे संपूर्ण भारतात नावलौकिक पावलेली ही सहकारी तत्वावरील वीज सोसायटी अस्त पावली.

तरी देखील या सोसायटीच्या माध्यमातून जवळपास चार दशके नगर जिल्हयातील मोठा प्रांत कृषी, नागरी, व्यापारी, आणि औद्योगिक दृष्टया विकासाकडे नेण्याचा उपक्रम खरोखर स्तुत्य आहे. विशेषतः श्रीरामपूर तालुका आर्थिक भरभराटीकडे नेण्यात मुळा प्रवरा वीज सोसायटीचे योगदान हे नक्कीच अलौकिक ठरते.

### *संदर्भ :–*

1.दि.मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर, वार्षिक अहवाल, 1971–1972 पा.नं.1.
2.Guru D.D.,QamarAhsan, Energyand economic development,Amar Prakashan, Delhi, Edition, 1987, P.130.
3.दि. मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर, वार्षिक अहवाल, 1986–1987 पा.नं. 9.
4.दि.मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर, वार्षिक अहवाल, 2008–2009 पा.न. 2
5.दि.मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर, वार्षिक अहवाल, 1986–1987 पा.नं. 11.
6.दि.मुळा–प्रवरा इलेक्ट्रीक को–ऑप.सोसायटी लिमिटेड, श्रीरामपूर, वार्षिक अहवाल,2007–2008 पा.न. 2.
7.By-Laws Of The Mula-Pravara Co-Op. Electric Society Ltd., Shrirampur, (As amended up to 20/10/1985), p.1.
8.डॉ. भोंगळे सुधिर जगन्नाथ, राजकारण पाण्याचे, राजहंस प्रकाशन, पुणे, 1998, ISBN: 81.7454.102.1, पान.नं. 210.
9.सार्वमत, वर्तमानपत्र, रौप्यमहोत्सवी विशेषांक, पान.नं.99.
10.शिंदे रावसाहेब, विचारवेध, अमेय प्रकाशन, पुणे, 2013, ISBN: 978-93-5080-049-2, पान.नं. 90.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net